रजि.नं. PNA/BNK/200/स्थापना १५ ऑगस्ट १९७२

सारस अर्बन
को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

मुख्य कार्यालय : सीटीएस क्र. ६७८/६७९,
चिंतामणी हाईटस्, स्वस्तिक सोसायटी,
कमिन्स कॉलेज रोड, कर्वेनगर पुणे - ५२
फोन : ०२०-२९९९३४६०, **मो.** ८३८०००३४६०
ईमेल : sarasurban@gmail.com
वेबसाईट : www.sarasurban.com

"सारस" म्हणजे विश्वासाची वज्रमूठ ...

सभासदांची साथ...
सभासदांचा विश्वास...
सभासदांचा प्रयास...
समाजाचा विकास...

५४वा
वार्षिक अहवाल
२०२५-२६

नवनिर्वाचित अध्यक्ष श्री. भालचंद्र कुलकर्णी यांचा सत्कार करताना

स्वामी विवेकानंद जयंती कार्यक्रम

कोथरूड शाखा नवीन जागेत स्थलांतरप्रसंगी जिल्हा उपनिबंधक मा. श्री. संजय राऊत व अन्य मान्यवर

पतसंस्थेच्या ५४ व्या वर्धापनदिनी उपस्थित मान्यवर

संस्थेतर्फे गणेशोत्सव सणानिमित्त ठेवीदार सभासदांना ‘गणपती पूजा साहित्य’ सप्रेम भेट

संस्थेमध्ये विविध शाखांमध्ये तिळगुळ समारंभ कार्यक्रम

रजि.नं. PNA/BNK/200/स्थापना १५ ऑगस्ट १९७२
सारस अर्बन
को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

मुख्य कार्यालय : सीटीएस क्र. 678/679,
चिंतामणी हाईटस्, स्वस्तिक सोसायटी,
कमिन्स कॉलेज रोड, कर्वेनगर पुणे – 52
फोन : 020-29993460, मो. 8380003460
ईमेल : sarasurban@gmail.com
वेबसाईट : www.sarasurban.com

54 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना
(फक्त सभासदांसाठी)

या सूचनेद्वारे सभासदांना कळविण्यात येते की सारस अर्बन को. ऑप क्रेडिट सोसायटी लि. कर्वेनगर, पुणे 411052 या पतसंस्थेची **54 वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार, दि. 29 सप्टेंबर 2026 रोजी सायं 4.00 वाजता उद्यान मंगल कार्यालय, खजिना विहीर चौकाजवळ, सदाशिव पेठ, पुणे – 30** येथे होणार असून संस्थेच्या सभासदांना विनंती की त्यांनी या सभेस उपस्थित राहावे.

सभेपुढील विषय :

1) मागील वार्षिक सर्वसाधारण सभा दि. 29.09.2025चे व विशेष सर्वसाधारण सभा दिनांक 14.01.2026 व दिनांक 30.03.2026 रोजीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
2) सन 2025-26 चा वार्षिक अहवाल स्वीकृत करणे.
3) सन 2025-26 चा ताळेबंद आणि नफा-तोटा पत्रक स्वीकृत करणे.
4) सन 2025-2026 या आर्थिक वर्षाच्या वैधानिक सनदी लेखापरीक्षक यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखापरीक्षण अहवालाची नोंद घेणे.
5) मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर यांच्याकडे सादर केलेला सन 2024-25 च्या दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
6) आर्थिक वर्ष 2026-27 च्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
7) संचालक मंडळ आणि त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची माहिती देणे.
8) मा. सहकार आयुक्त व निबंधकांनी जाहीर केलेल्या नामतालिकेवरील पात्र वैधानिक लेखापरीक्षकांची सन 2026-2027 या आर्थिक वर्षासाठी नियुक्ती करणे व त्यांचे मानधन ठरवणे.
9) सन 2025-2026 या वर्षात शासन परीपत्रकान्वये सामोपचार योजनेनुसार बंद केलेल्या कर्ज खात्यांना दिलेल्या व्याज सुट रकमेस कार्योत्तर मंजुरी देणेबाबत.
10) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.
11) सेवक आकृतीबंध (स्टाफिंग पॅटर्न) ला मान्यता देणे.
12) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आलेल्या आयत्या वेळेच्या विषयांवर विचार करणे.

संचालक मंडळाच्या आदेशावरून

स्थळ : कर्वेनगर, पुणे — **फडके सुहास भास्कर**
दिनांक : 5 सप्टेंबर 2026 — मुख्य कार्यकारी अधिकारी

विशेष सूचना :

1) गण संख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास वरील सभा त्याच दिवशी अर्ध्या तासाने म्हणजेच सायं. 4.30 वाजता त्याच ठिकाणी घेण्यात येईल.
2) सभासदांना वरील विषयासंबंधी काही विचारावयाचे असल्यास अगर सूचना करायची असल्यास त्यांनी 7 दिवस आधी संस्थेच्या मुख्य कार्यालयात संपर्क साधावा, वेळोवेळी आपल्या सूचना, मार्गदर्शन प्रार्थनीय आहे.
3) सभासदांनी आपला पूर्ण पत्ता, फोन क्रमांक व ई-मेल आयडी अद्ययावत करावा.
4) संस्थेचा आर्थिक वर्षाचा अहवाल आपल्या जवळच्या शाखेमध्ये दि. 15/09/2026 पासून उपलब्ध राहील. अथवा संस्थेच्या वेबसाईटवर वार्षिक अहवाल पहावा. वेबसाईट : www.sarasurban.com

संचालक मंडळ सन 2023-2028

अध्यक्ष :- **श्री. कुलकर्णी भालचंद्र वसंत** (दिनांक. 07.11.2025 पासून)
उपाध्यक्ष :- **श्री. जरांडे नितीन म्हस्कू**
संचालक :- **श्री. धारप गणेश गंगाधर**
संचालक :- **श्री. चंपानेरकर जितेंद्र दत्तात्रय**
संचालक :- **श्री. रसाळ सुनील विठ्ठल**
संचालक :- **श्री. कावळे अनिल मुरलीधर**
संचालक :- **श्री. दीक्षित शरद दत्तात्रय**
संचालिका :- **सौ. मोकासदार उल्का चारुदत्त**
तज्ञ संचालक :- **श्री. भवाळकर गिरीश शांताराम**
तज्ञ संचालक :- **श्री. नातू विजय सदाशिव**
मुख्य कार्यकारी अधिकारी :- श्री. फडके सुहास भास्कर

संचालक :- **श्री. पायगुडे शरद बाळकृष्ण** (दिनांक 08.10.2025 पर्यंत अध्यक्ष)
संचालिका :- **श्रीमती ओगले प्राची प्रकाश** (दिनांक. 08.10.2025 पर्यंत)
तज्ञ संचालक :- **श्री. मिटकरी रमाकांत नानासाहेब** (दिनांक. 08.10.2025 पर्यंत)

ठेवींवर सातत्याने 10% व्याज देणारी पतसंस्था.... 54 वर्षांचा विश्वास व प्रगतीचा प्रवास

सर्व शाखांमध्ये लॉकर्स उपलब्ध. सोनेतारण कर्ज तत्काळ उपलब्ध

वैयक्तिक अपघात विमा पॉलिसी, मेडिक्लेम पॉलिसी म्युच्युअल फंड अल्पदरात सभासदांना उपलब्ध

शनिपार शाखा
751 सदाशिव पेठ, क्षितीविनायक अपार्ट.,
कुमठेकर रोड, पुणे 411030
फोन : (020) 24471890, मो. : 8380003457

कोथरूड शाखा
स. नं. 87 भेलके वास्तू, ऑफिस नं. 1 व 2,
सुतार दवाखाना चौक, सिद्धीविनायक मंदिरासमोर,
कोथरूड, पुणे 411038, मो. : 8380003461

कर्वेनगर शाखा
पाटोळे निवास, कुलश्री कॉलनी, कमिन्स कॉलेज रोड,
कर्वेनगर, पुणे 411052
मो. : 8380003459/62

राजगुरूनगर शाखा
धनी निवास, आझाद चौक,
राजगुरूनगर, ता. खेड, जि. पुणे 410 505
मो. : 8275104408

अध्यक्षीय मनोगत

सन्माननीय सभासद, स्नेहपूर्वक नमस्कार !

आजच्या 54 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत आपल्या सर्व संचालकांच्या वतीने स्वागत करीत आहोत. यावर्षी आपल्या संस्थेनी 15 ऑगस्ट 2026 रोजी 55 व्या वर्षात पदार्पण केलेले आहे.

दि. 31 मार्च 2026 अखेर संस्थेच्या एकूण ठेवी रु. 41 कोटी असून एकूण कर्जे रु. 33 कोटी इतकी आहेत. गेल्या अनेक वर्षांची थकीत कर्जांची आता चांगली वसुली होऊ लागली आहे. त्यामुळे यावर्षी आपल्या संस्थेला रु. 19 लाख 51 हजारांचा नफा झालेला आहे, ही आनंदाची बाब आहे. जुन्या थकीत कर्जांपैकी 100% वसुली पूर्ण होईल, त्यामुळे चालू आर्थिक वर्षात 2026-27 मध्ये आपला सर्व संचित तोटा भरून निघेल, असा विश्वास वाटतो.

आपली संस्था आजही समाजातील लहान व्यावसायिकांना व बचत गटाच्या महिलांना छोट्या रक्कमेचे कर्ज वाटप करत आहे व सदर खात्याची वसुलीही अत्यंत चांगल्या प्रकारे होत आहे. नवीन संचालक मंडळ आल्यापासुन वाटप केलेल्या कर्जात कोणतीही थकबाकी नाही. जुन्या थकीत कर्जातही आवश्यक व पुरेसे तारण असल्यामुळे ती वसूल होण्याची प्रक्रिया आता मोठ्या प्रमाणावर सुरू झाली आहे. सोनेतारण व्यवहार देखील आता दिवसेंदिवस वाढत आहेत.तात्काळ कर्जवाटपावर यासाठी भर देण्यात आला आहे. लवकरच मोबाईल ॲपसुविधा ग्राहकांसाठी देखील सुरु करत आहोत. ज्यामुळे सभासद, खातेदारांना घरबसल्या अनेक व्यवहार सहजपणे व सुरक्षितपणे करता येतील.

संस्थेला नफ्यात आणण्यासाठी कर्ज वाटप करण्यासाठी ठेवींची आवश्यकता असते. त्यासाठी आपण अधिकतम 10% इतका ठेवींसाठी व्याजदर देत आहोत. आपण आपल्या संस्थेमध्ये जास्तीत जास्त ठेवी ठेवाव्यात म्हणजे कर्ज वाटप करून, संस्थेला पूर्ववत नफ्यात आणणे शक्य होईल. याबरोबरच सभासदांनी भागभांडवलात वाढ करावी व संस्थेची आर्थिक सक्षमता वाढवावी, असे आवाहन आहे.

आपल्या पतसंस्थेचे सर्व कर्मचारी, अधिकारी यांनी देखील गेल्या वर्षात चांगली कामगिरी केली आहे. ठेवी, कर्जे वाढवण्याबरोबरच थकबाकी वसूलीसाठी चांगले प्रयत्न करत आहेत. गेली अनेक वर्षे कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी निश्चित केलेली नव्हती, ती नुकतीच पूर्ण करुन सर्वांना चांगली पगारवाढ देखील दिलेली आहे. त्याचबरोबर पदनाम (पोस्ट) देखील निश्चित करुन त्यानुसार दरवर्षी वेतनवाढीची निश्चितता केली आहे. यासाठी विशिष्ट प्रकारची व्यावसायिक उद्दीष्टे (टार्गेटस्) देण्यात आली आहेत. याबरोबरच दैनंदिन ठेव प्रतिनिधी (पिग्मी एजंटस्) देखील चांगली कामगिरी करीत आहेत. कर्मचाऱ्यांचा उत्साह चांगला वाढलेला असल्याने चालू आर्थिक वर्षात त्याचे चांगले परिणाम दिसतील अशी खात्री वाटते.

आपल्या सर्व चारही शाखांमध्ये आता लॉकर सुविधादेखील उपलब्ध झाली आहे. त्याचबरोबर सभासदांना आरोग्य विमा, मेडिक्लेम, अपघात विमा असे कमी प्रिमिअम असलेल्या सुविधा देत आहोत. तसेच सभासदांसाठी आरोग्य शिबिरे, प्रशिक्षण मेळावेदेखील घेत आहोत. सभासदांच्या सक्रिय पाठिंब्यावरच संस्था प्रगतीपथावर राहील. या वर्षीच्या गणेशोत्सवासाठी सभासदांना गणपती पूजेचे साहित्य सप्रेम भेट देण्याची विशेष योजना सुरू केली आहे. ज्याचा सभासदांनी आनंद व्यक्त केला आहे.

आपल्या पतसंस्थेची वेबसाईट देखील नव्याने सुरु करण्यात आली आहे. त्यावर अधिकाधिक माहिती तसेच विविध ठेव व कर्ज योजनांची माहिती, संचालक मंडळाबाबतची माहिती देण्यात आली आहे. संस्थेची आर्थिक स्थिती, वार्षिक अहवाल देखील वेबसाईटवर पाहता येणार आहेत. पारदर्शक पध्दतीने सर्व आर्थिक व्यवहार व सत्य माहितीसभासद व खातेदारांना देण्याचा आमचा हा प्रयत्न आहे.

संचालक मंडळ :

गेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये आपल्या संचालक मंडळामध्ये तज्ज्ञ संचालक म्हणून श्री. गिरीश भवाळकर यांची निवड करण्यात आली होती. नंतरच्या काळात ज्येष्ठ अर्थ व विमातज्ज्ञ श्री. विजय नातू यांची देखील तज्ज्ञ संचालक म्हणून निवड करण्यात आली आहे. या दोघांच्याही अनुभवाचा तसेच माझे सर्व सहकारी संचालकांचा

अनुभवाचा, जनसंपर्काचा चांगला उपयोग आपल्या संस्थेला होत आहे. आपल्या महिला संचालिका सौ. उल्का मोकासदार यांनी महिला बचतगट तसेच छोट्या कर्जदारांसाठी चांगले अभियान सुरु केले आहे. कायदेतज्ज्ञ संचालक ॲड. अनिल कावळे यांचेदेखील वसूलीकामी मोलाचे सहकार्य मिळत आहे. राजगुरुनगर शाखेचा पालक संचालक श्री. दीक्षित यांच्या अथक प्रयत्नांमुळे राजगुरुनगर शाखेमध्ये भरघोस ठेवी येत असून चांगली आर्थिक स्थिती ठेवली जात आहे. लघुउद्योजकांना कर्जपुरवठा जास्तीत जास्त प्रमाणात देण्यासाठी संचालक श्री. जितेंद्र चंपानेरकर व उपाध्यक्ष श्री. नितीन जरांडे यांचे अथक प्रयत्न सुरू आहेत. तसेच ज्येष्ठ संचालक श्री. गणेश धारप यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभत आहे. गेल्या वार्षिक सभेनंतर श्री. शरद पायगुडे यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्याने माझ्यावर अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली. सर्व संचालकांची चांगली साथ लाभत आहे, याबद्दल मनापासून धन्यवाद व्यक्त करतो.

आभार आणि कृतज्ञता :

आपल्या संस्थेला सहकार खात्याचे सर्वच अधिकारी वर्गाचे विशेषत: मा. जिल्हा उपनिबंधक, पुणे शहर श्री. कैलास जेबले साहेब व पूर्व जिल्हाउपनिबंधक श्री. संजय राऊत साहेब, मा. सहाय्यक निबंधक श्री. एच. व्ही. तावरे व सौ. प्रगती वाबळे व सुदाम तांदळे साहेब यांचे सदैव मार्गदर्शन लाभत आलेले आहे त्याच बरोबर सहकार भारतीचे पदाधिकारी डॉ. उदय जोशी, श्री. सतीशजी मराठे, श्री. विवेक जुगादेजी, डॉ. शांतीलाल सिंगीजी तसेच महाराष्ट्र राज सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन, संचालक श्री. काका कोयटे तसेच आपल्या संस्थेचे सल्लागार श्री. गणेश निमकर या सर्वांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभत आहे.

सर्व कायदेविषयक सल्लागार, लेखापरीक्षक पीओसिट सॉफ्टवेअरचे अधिकारी, सर्व पत्रकार व विविध माध्यमांचे प्रतिनिधी अशा सर्वांचेच आभार व्यक्त करतो याशिवाय आपले सर्व भागधारक, ठेवीदार, कर्जदार हितचिंतक तसेच निष्ठावंत कर्मचारी वर्ग याबद्दल संचालक मंडळ सर्वांचे ऋणी आहे. जय सहकार !!

भालचंद्र कुलकर्णी,
अध्यक्ष

● अंदाजपत्रक 2026-27 ●

उत्पन्न तपशिल	अंदाजे उत्पन्न (2025-26)	प्रत्यक्ष उत्पन्न (2025-26)	अपेक्षित उत्पन्न (2026-27)
व्याज वसूल कर्जावरील	1,50,00,000	4,15,88,000	4,50,00,000
व्याज वसूल गुंतवणुकी वरील	1,00,00,000	67,19,000	80,00,000
इतर उत्पन्न	40,00,000	7,91,000	12,00,000
एकूण	**2,90,00,000**	**4,90,98,000**	**5,92,00,000**
खर्च तपशील	**अंदाजे खर्च (2025-26)**	**प्रत्यक्ष खर्च (2025-26)**	**अपेक्षित खर्च (2026-27)**
व्याज दिले ठेवीवरील	3,60,00,000	3,45,90,000	3,75,00,000
व्याज दिले बँक कर्जावरील	25,00,000	38,18,000	20,00,000
पगार खर्च, प्रो. फंड, सानुग्रह अनुदान	55,00,000	43,50,000	50,00,000
व्यवस्थापकीय खर्च	60,00,000	31,81,000	37,00,000
घसारा डेड स्टोक	5,00,000	4,62,000	5,00,000
इमारत जागा घसारा	4,00,000	3,60,000	4,00,000
व्यवसाय वृद्धी खर्च	5,00,000	1,86,000	4,00,000
कर्ज रिबेट		2,00,000	5,00,000
नफा तोटा	-2,24,00,000	+19,51,000	+50,00,000

संस्थेचा वार्षिक अहवाल

आर्थिक विवेचन

भागभांडवल : संस्थेचे अधिकृत भागभांडवल रु. 4,00,00,000 (रु. चार कोटी) आहे. संस्थेचे वसुल भागभांडवल 1,88,62,510 आहे. सन 2025-26मध्ये या आर्थिक वर्षात भागभांडवल मध्ये 5,84,100 ने घट झालेली आहे. अनेक कर्जखाती बंद करताना भागभांडवल वर्ग केल्याने सदर रक्कम कमी झालेली आहे.

सभासद : आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये संस्थेत 600 नव्याने सभासद झाले 933 सभासदांनी सभासदत्वचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे सभासदांच्या एकूण संख्येत 326 ने घट झाली असून संस्थेची एकूण सभासद संख्या 15,509 आहे.

ठेवी : सन 2024-25मध्ये संस्थेच्या एकूण 38,92,97,365.11 ठेवी होत्या. आर्थिक वर्ष सन 2025-2026 मध्ये रु. 2,09,95,495.89 इतक्या ठेवींची वाढ झाली आहे. त्यामुळे वर्षाखेरीस रु. 41,02,92,861 इतक्या ठेवी आहेत. ठेवींमध्ये होणारी वाढ ही संस्थेची भक्कमता दर्शविते.

गुंतवणूक : मार्च 2026 अखेर संस्थेची गुंतवणूक रु. 9,14,06,603.83 इतकी आहे. ठेवींच्या तुलनेत संस्थेने केलेली गुंतवणूक ही 22.29 % इतकी आहे.

कर्ज : सन 2024 -25 संस्थेची एकूण येणे कर्जे रक्कम 32,99,17,443.39 इतकी होती. गेल्या आर्थिक वर्षात चांगली मोठी वसूली झाल्यामुळे सन 2025-26 मध्ये कर्ज रकमेत 1,39,10,242.06 इतकी घट झालेली आहे. संस्थेने महिला बचत गटांना (409 महिला) रक्कम रु. 1 कोटी 41 लाखांचे कर्ज दिले असून त्याची वसुली 100% आहे. सन 2025-26 अखेर संस्थेचे येणे कर्ज बाकी रक्कम रु. 31,60,07,201.33 आहे संस्था कर्ज देताना पुर्णपणे सुरक्षित कर्ज देण्याकडे लक्ष देत आहे आणि ठेवींच्या तुलनेत 77% वितरण केले आहे. मोठ्या थकीत कर्ज वसुलीच्या दृष्टीने संचालक मंडळ व सेवक मोठ्या प्रमाणात प्रयत्न करत असून थकीत रक्कमेची वसुली होत आहे.

संस्थेच्या कोणत्याही संचालकांचे किंवा त्यांच्या नातेवाईकांचे संस्थेत कर्ज नाही.

संस्थेची मालमत्ता : संस्थेच्या स्वत:च्या मालकीच्या कुमठेकर रोड व कर्वेनगर अशा प्रशस्त जागा आहेत. या जागांची अंदाजे किंमत रु. 3 कोटी आहे.

नॉन बँकिंग असेटस् : संस्थेने काही कर्जदारांवर कारवाई करून त्यांची तारण मालमत्ता कलम 100/85 अन्वये संस्थेच्या नावाने करून घेतलेली आहे. आज मितीस सदर सर्व जागांवर आपल्या पतसंस्थेचे मालकी हक्काने नाव लागलेले आहे. त्याची आज रोजीची ताळेबंदातील रक्कम रु. 5 कोटी 56 लाख इतकी आहे. प्रत्यक्ष बाजारभावाची किंमत किमान रु. 20 कोटी पेक्षा अधिक आहे.

कर्मचारी : कर्मचारी सेवक वर्ग संस्थेच्या विकासासाठी महत्वाचा असुन त्यांचे योगदान महत्वाचे असते. संचालक मंडळाने आखून दिलेल्या नियमांचे काटेकोर पालन करून त्याची अंमलबजावणी करण्याचे काम कर्मचारीवर्ग करीत असतो. संस्थेचे कामकाज वाढावे, व्यवसाय वाढावा यासाठी सर्व कर्मचारी सातत्याने झटत आहेत. सभासदांना घरपोच सेवाही देत आहोत. संस्थेच्या ठेवी वाढवणे, कर्ज योग्य पद्धतीने वितरण

करणे, सभासदांना / ग्राहकांना मार्गदर्शन आणि उत्तम सेवा देणे, कर्जदारांची वसुली करणे, त्यांना कर्ज हप्ते नियमित भरण्यासाठी प्रवृत्त करणे यासारखी अनेक कामे कर्मचारी नियमीतपणे करत आहेत आणि त्यामुळेच संस्था प्रगतीपथावर पोहोचू शकली आहे.

तसेच सेवकांच्या कामाचा विचार संचालक मंडळ यांनी केला असून ह्या वर्षी संचालक मंडळाने त्यांच्या श्रेणीनुसार उत्तम प्रकारे पगार वाढ दिलेली आहे.

लेखापरीक्षण : संस्थेचे सन 2025-26 या आर्थिक वर्षासाठीचे वैधानिक लेखापरीक्षण मे. तोरवी पेठे अँड कंपनी चे सी.ए. श्री. लकडे योगेश यांनी केले आहे.

नफा : दि. 31.03.2026 अखेर आपल्या पतसंस्थेला चालू वर्षासाठीचा निव्वळ नफा रु. 19,51,472.29 झाला आहे, ही आनंदाची बाब आहे.

प्रशिक्षण : संस्थेच्या सेवकांना आणि संचालकांना संस्थेचे काम करत असताना अद्ययावत विषयांचे, नियमांचे, पद्धती आणि कायद्यामध्ये होणाऱ्या बदलांचे ज्ञान मिळणे आवश्यक असते आणि त्यासाठी तज्ञ लोकांकडून मार्गदर्शन घेणे गरजेचे असल्यामुळे संस्था वेळोवेळी प्रशिक्षण कार्यक्रम घेते आणि कर्मचारी व संचालकांना प्रशिक्षण देते. ह्या अहवाल वर्षातही अशा पद्धतीचे प्रशिक्षण सहकार भारती प्रशिक्षण संस्थेच्या वतीने देण्यात आले आहे.

आरोग्य शिबिरे : संस्थेच्या सभासदांच्या हितासाठी व अनेक हितचिंतक जोडण्यासाठी आपल्या परिवारात सामील करण्यासाठी गेल्या आर्थिक वर्षात संस्थेने कर्वेनगर व कोथरूड शाखेत आरोग्य शिबीर आयोजित केले. त्यास संस्थेच्या ग्राहकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

सभासद मेळावा : राजगुरूनगर शाखेत सभासद आनंद मेळावा घेण्यात आला मेळाव्यास साधारण 200 च्या वर सभासद उपस्थित होते त्यावेळी ज्येष्ठ सभासदांचा सत्कार करण्यात आला.

कोथरुड शाखा स्थलांतर : आपल्या संस्थेच्या कोथरुड शाखेचे नवीन प्रशस्त जागेत स्थलांतर दि. 21 फेब्रुवारी 2026 रोजी करण्यात आले आहे. स्थलांतर कार्यक्रमास मा.श्री. संजय राऊत मा. जिल्हा उपनिबंधक सह. संस्था पुणे उपस्थित होते. या कार्यक्रमाप्रसंगी पुणे म.न.पा.चे नगरसेवक मा. श्री. पृथ्वीराज सुतार, मा. सौ. अल्पना वरपे, मा. सौ. ज्योत्स्ना कुलकर्णी. हे ही उपस्थित होते.

तिळगुळ समारंभ:- संस्थेच्या सर्व शाखांमध्ये दरवर्षी प्रमाणे यंदाच्या वर्षी देखील तिळगुळ समारंभ आयोजित करण्यात आला. सर्व महिला सभासदांना बोलावून त्यांना वाण देण्यात आले. या कार्यक्रमास महिलांनी उपस्थित राहून आनंद व्यक्त केला.

मान्यवरांच्या भेटी : गेल्या आर्थिक वर्षात संस्थेस रिझर्व्ह बँकेचे संचालक श्री. सतीशजी मराठे, सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदयराव जोशी, सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशचे महामंत्री श्री. विवेक जुगादे, अ. भा. ब्राह्मण महासंघाचे अध्यक्ष गोविंदराव कुलकर्णी, राज्य पतसंस्था फेडरेशनचे संचालक श्री. काका कोयटे आदी मान्यवरांनी संस्थेस भेटी दिल्या व संस्थेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले आहे. याचबरोबर संस्थेचे मार्गदर्शक व तज्ज्ञ सल्लागार श्री. गणेश निमकर यांनी नियमितपणे संस्थेच्या कामकाजाबाबत आवश्यक सूचना केल्या आहेत.

TORVI PETHE AND COMPANY
CHARTERED ACCOUNTANTS
Registered Office : Kunal Lexus, Flat No. 5, 3rd Floor, Opp. Nirmitee House, Off. Law College Road, Next Lane to Entrance Gate of SNDT College, Gulmohar Path, Pune - 411004.
Branch Office : S No 568/33, Flat No - 3 and 4, Second floor, Ganesh Prasad Building, Kanchanganga Housing Society, Bibwewadi, Pune - 411037.
Email : cayogeshlakade@gmail.com, Mob. : 9822908714

वर्ष २०२५-२६ साठी स्वतंत्रलेखापरीक्षक अहवाल

१) **आर्थिकपत्रकांवर अहवाल : -**

संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभा दि.सप्टेंबर २९, २०२५ ठराव क्रं. ८ नुसार आम्ही दि. एप्रिल ०१, २०२५ ते मार्च ३१, २०२६ या कालावधीचे सारस अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी लिमिटेड पुणे, (पतसंस्था) च्या सोबतच्या आर्थिकपत्रकांचे लेखापरीक्षण केले आहे, ज्यात **दि. ३१ मार्च २०२६** च्या आर्थिक वर्षाअखेरीचा ताळेबंद, आणि त्यादिवशी संपलेल्या वर्षाचे नफा-तोटा खाते रोखप्रवाहपत्रक (कॅशफ्लो) आणि महत्त्वपूर्ण लेखाधोरणांचा सारांश, टीपा आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहिती यांचा समावेश आहे. आमच्याकडून लेखापरीक्षण केलेल्या ५ शाखांचे विवरण या आर्थिकपत्रकांमध्ये समाविष्ट केले आहे.

२) **आर्थिकपत्रकांसाठी व्यवस्थापनाची जबाबदारी : -**

सहकारी सोसायट्यांचे रजिस्ट्रार, महाराष्ट्र, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 आणि महाराष्ट्र सहकारी संस्था यांनी दिलेली मार्गदर्शक तत्त्वे नियम, १९६१, (लागू असणारे) आणि भारतामध्ये सामान्यतः स्वीकारले गेलेले लेखातत्त्वे (पतसंस्थेला लागू असणारे) यानुसार पतसंस्थेची आर्थिक स्थिती आणि आर्थिक कामगिरी, खरा व रास्त दृष्टीकोन दाखवणारी आर्थिकपत्रके तयार करण्यास व्यवस्थापन जबाबदार आहे. या जबाबदाऱ्यामध्ये अंतर्गत नियंत्रणाची रचना, अंमलबजावणी आणि देखभाल समाविष्ट आहे जे आर्थिक गैरवर्तनापासून मुक्त असलेल्या (मग ते फसवणूक किंवा त्रुटीमुळे असो.) आर्थिकपत्रकांच्या तयारीशी संबंधित आहे.

३) **लेखापरीक्षकांची जबाबदारी : -**

आमच्या लेखापरीक्षणाच्या आधारे या आर्थिकपत्रकांवर मत व्यक्त करण्याची आमची जबाबदारी आहे. आम्ही इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाने जारी केलेल्या लेखापरीक्षण मापदंडानुसार आमचे लेखापरीक्षण केले. त्या मानकांची आवश्यकता आहे की आम्ही नैतिक आवश्यकतांचे पालन करतो आणि आर्थिकपत्रके भौतिक चुकीच्या विधानांपासून मुक्त आहे की नाही याबद्दल वाजवी आश्वासन प्राप्त करण्यासाठी लेखापरीक्षणाची योजना आखतो आणि त्याप्रमाणे लेखापरीक्षण करतो.

४) लेखापरीक्षणामध्ये आर्थिकपत्रकांमधील रक्कम आणि प्रकटीकरणाविषयी लेखापरीक्षण पुरावे मिळवण्यासाठी प्रक्रिया करणे समाविष्ट असते. निवडलेल्या कार्यपद्धती लेखापरीक्षकांच्या निर्णयावर अवलंबून असतात, ज्यात फसवणूक किंवा त्रुटीमुळे आर्थिक पत्रकाच्या भौतिक चुकीच्या विधानांच्या जोखमींचे मूल्यमापन समाविष्ट आहे. त्या जोखमीचे मूल्यमापन करताना, लेखापरीक्षक पतसंस्थेने केलेल्या आर्थिकपत्रकाच्या रास्त सादरीकरणाशी संबंधित अंतर्गत नियंत्रण विचारात घेतात जेणेकरून परिस्थितीनुसार योग्य असलेल्या लेखापरीक्षण प्रक्रियेची रचना केली जाते, परंतु पतसंस्थेच्या अंतर्गत नियंत्रणाच्या प्रभावीतेवर मत व्यक्त करण्याच्या हेतूने लेखापरीक्षण प्रक्रियेची रचना केली जात नाही. लेखापरीक्षणामध्ये वापरलेल्या लेखाधोरणांची योग्यता आणि व्यवस्थापनाने केलेल्या लेखाअंदाजांच्या वाजवीपणाचे मूल्यमापन करणे, तसेच आर्थिकपत्रकाच्या एकूण सादरीकरणाचे मूल्यमापन करणे यांचा समावेश होतो.

५) **आमचा विश्वास आहे की आम्हाला मिळालेले लेखापरीक्षण पुरावे आमच्या लेखापरीक्षणाच्या मताला आधार देण्यासाठी पुरेसे आणि योग्य आहेत.**

६) **मत : -**

खालील लेखामानकांचे पालन केले गेले नाही:

कर्मचारी सेवानिवृत्तीलाभ आवश्यक प्रकटीकरण न करण्याबाबत लेखामानक – १५

a. वरील शेऱ्यास पात्र राहून, तसेच आमच्या स्वतंत्र अहवालास पात्र राहून, आमच्या मते आणि आमच्या सर्वोत्तम माहितीनुसार आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणांनुसार, आणि टिपांसह महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ ने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचना (लागू असणाऱ्या) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था आयुक्त यांनी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचना प्रमाणे आवश्यक त्या पद्धतीने आणि भारतात सामान्यतः स्वीकारल्या गेलेल्या लेखातत्त्वांच्या अनुषंगाने

b. ताळेबंदासंबंधी, ३१ मार्च २०२६ रोजी पतसंस्थेच्या आर्थिक परिस्थितीची स्थिती,

c. नफा आणि तोटा खात्याच्या बाबतीत, त्या तारखेला संपलेल्या वर्षाचा नफा; यांची खरी व रास्त परिस्थिती दाखवतात.

इतर कायदेशीर बाबींवर अहवाल: -

७) पतसंस्थेचा ताळेबंद व नफातोटापत्रक महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ प्रमाणे तयार केलेले आहेत.

८) **आम्ही नमूद करतो की:**

येथे परिच्छेद ६ मधील आमच्या टिप्पण्यांच्या अधीन राहून,

a. आम्ही सर्व माहिती आणि स्पष्टीकरण प्राप्त केले आहे, जे आमच्या सर्वोत्तम ज्ञानाप्रमाणे आणि विश्वासाप्रमाणे आमच्या लेखापरीक्षणासाठी आवश्यक होते आणि ते समाधानकारक असल्याचे आढळले आहे;

b. आमच्या मते, कायद्याने आवश्यकते नुसार खात्याची योग्य पुस्तके पतसंस्थेने ठेवली आहेत असे त्या पुस्तकांच्या आमच्या परीक्षेतून दिसते आणि आमच्या लेखापरीक्षणाच्या हेतूंसाठी आवश्यक पत्रके शाखा/ कार्यालयांकडून प्राप्त झाली आहेत;

c. पतसंस्थेचे जे व्यवहार आमच्या दृष्टोत्पत्तीस आले आहेत ते पतसंस्थेच्या अधिकारात आहेत;

d. या अहवालामध्ये नमूद केलेले ताळेबंद आणि नफा-तोटा खाते, हिशोब पुस्तकांशी आणि पत्रकांशी सहमत आहेत;

e. पतसंस्थेने स्वीकारलेली लेखामानके पतसंस्थांसाठी लागू असलेल्या भारतात सामान्यतः स्वीकारल्या गेलेल्या लेखातत्त्वांनुसार निर्धारित केलेल्या मानकांशी सुसंगत आहेत.

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम 1961 चे नियम 69 (6) नुसार आवश्यक तपशील स्वतंत्रपणे लेखापरीक्षण निवेदनामध्ये दिले आहेत.

९) आम्ही पुढे नोंदवतो की लेखापरिक्षणाखालील वर्षासाठी, पतसंस्थेला **"ब"** वर्गीकरण देण्यात आले आहे.

तोरवी पेठे अँन्ड कंपनी करिता.
चार्टड अकौटंटस
एफ आर नंबर: १२०४५६डब्लू

सी ए योगेश राजगोपाल लकडे
भागीदार
सदस्य नंबर: १३२८२४
सहकारी सदस्य नंबर: १६७३८
UDIN: 26132824WVSCQL8828
तारीख: जुलै ३१, २०२६ ; पुणे.

TORVI PETHE & COMPANY
M. No. 132824
FRN 120456W
Chartered Accountants

दि. 31 मार्च 2026 अखेरचे ताळेबंदपत्रक

31/03/2025 Rs. Ps.	भाग भांडवल व देणी	31/03/2026	Rs. Ps.
4,00,00,000.00	अधिकृत भाग भांडवल		4,00,00,000.00
1,94,47,410.00	**वसूल भाग भांडवल**		**1,88,62,510.00**
1,94,46,610.00	वसूल भाग भांडवल (प्रति शेअर १०० रु. प्रमाणे)	1,88,62,510.00	
800.00	भागभांडवल अनामत	–	
5,40,40,137.29	**इतर निधी**		**5,62,19,396.29**
1,75,09,130.49	गंगाजळी निधी	1,96,88,389.49	
2,12,53,575.77	बुडित संशयीत निधी (अनुत्पदित जिंदगीवरील तरदुत निधी)	2,40,94,703.86	
4,67,597.23	लाभांश समानीकरण निधी	–	
1,15,40,641.43	इमारत निधी	1,15,40,641.43	
19,27,042.30	गुंतवणुक चढउतार निधी	–	
8,95,661.51	उत्पादित जिंदगीवरील तरतुद	8,95,661.51	
2,02,221.90	कल्याण निधी	–	
2,44,266.66	कार्यक्रम निधी	–	
38,92,97,365.11	**ठेवी**		**41,02,92,861.00**
62,610.00	एजंट भरणा	62,610.00	
4,83,850.00	दैनंदिन ठेव	12,66,450.00	
3,78,28,952.38	बचत ठेव	2,49,77,234.27	
1,45,98,531.36	मुदत ठेव	94,84,859.36	
97,263.70	संचित ठेव	87,522.70	
11,74,929.67	अल्पमुदत ठेव	50,243.67	
80,000.00	सहामही ठेव	5,000.00	
34,16,231.00	तिमाही ठेव	7,96,231.00	
6,87,52,628.00	मासिक ठेव	1,85,11,951.00	
31,000.00	मासिक उत्पन्न ठेव	27,748.00	
5,000.00	वर्षा ठेव योजना	5,000.00	
65,52,686.00	आवर्तक ठेव	15,79,341.00	
42,500.00	लखपती योजना	49,912.00	
4,55,000.00	लखपती ठेव योजना	6,61,015.00	
2,03,47,000.00	लखपती पेन्शन योजना	1,50,23,000.00	
1,89,859.00	सुवर्ण महोत्सवी योजना	1,01,091.00	
1,00,000.00	अर्धशतक योजना	–	
7,11,900.00	अर्धशतक प्राप्ती	–	
40,96,457.00	सारस धनवर्षा योजना	9,85,241.00	
4,08,75,081.00	सारस समृद्धी योजना	40,46,000.00	
8,03,26,771.00	सारस निरंतर योजना	1,26,44,425.00	
5,99,09,162.00	सारस मान्सून ठेव योजना	6,79,46,157.00	
4,77,43,387.00	सारस मान्सून मासिक ठेव योजना	11,20,55,087.00	
7,04,566.00	सारस आवर्तक ठेव	48,76,626.00	
7,12,000.00	अल्पवधी मुदत ठेव	89,35,239.00	
0.00	सारस मुदत ठेव	6,62,13,774.00	
0.00	सारस संचयी योजना	5,50,54,289.00	
0.00	सारस आवर्तक ठेव योजना	29,76,914.00	
0.00	चालू खाते (करंट खाते)	2,000.00	
0.00	सारस शतम ठेव योजना	18,67,900.00	
46,27,84,912.40	**बेरीज पुढील पानावर**		**48,53,74,767.29**

दि. 31 मार्च 2026 अखेरचे ताळेबंदपत्रक

31/03/2025 Rs. Ps.	मालमत्ता व येणी	31/03/2026	31/03/2026 Rs. Ps.
2,34,483.00	**रोख शिल्लक**		**9,58,872.00**
2,34,483.00	रोख शिल्लक	9,58,872.00	
7,72,945.80	**बँकेतील ओ.डी/क्रेडिट**		**15,44,710.92**
0.00	पुणे पिपल्स बँक सी सी एच ओ	2,92,059.59	
1,30,632.35	पुणे पिपल्स बँक सी सी कोथरूड	6,26,227.88	
5,85,794.27	जनसेवा सहकारी बँक सी सी १५३ कर्वेसीसी	1,295.65	
27,222.28	राजगुरू नगर बँक	–	
29,296.90	ठाणे जनता सह बँक सी सी HO	6,25,127.80	
10,73,221.89	**रोख व बँकेतील शिल्लक**		**21,23,859.89**
3,09,767.20	पी.डी.सी.सी.बचत खाते नं.२.९४	2,69,297.20	
3,028.00	यशवंत बँक करंट खाते क्र १०१ कर्वेनगर	–	
6,67,149.69	आय सी आय सी आय बँक	18,54,562.69	
93,277.00	कॉसमॉस बँक	–	
9,19,26,048.71	**गुंतवणूक**		**9,14,06,603.83**
1,50,99,735.00	पुणे पिपल्स बँक मुदत ठेव	1,36,00,001.00	
29,95,129.00	सोलापूर जनता सह. बँक मुदत ठेव	29,95,129.00	
86,36,399.00	विश्वेशर सहकारी बँक मुदत ठेव	87,49,467.00	
14,00,000.00	ठाणे जनता सहकारी बँक मुदत ठेव	24,00,234.00	
0.00	डोंबिवली नागरी सहकारी बँक मुदत ठेव	5,00,110.00	
0.00	जनसेवा सहकारी बँक मुदत ठेव	5,00,130.00	
70,00,000.00	कॉसमॉस सहकारी बँक मुदत ठेव	70,00,000.00	
15,01,232.88	अंबरनाथ जय हिंद को ऑफ बँक लि	15,00,000.00	
5,00,000.00	जनसेवा सहकारी बँक ठेवी	5,00,000.00	
50,00,001.00	बारामती सह बँक ठेवी	65,00,001.00	
35,55,534.00	जनता बँक ठेवी	30,00,000.00	
80,19,603.00	पुणे मर्चंट्स को ऑप बँक सी.आर.आर.गुंतवणूक	80,19,603.00	
1,76,12,481.83	पी.डी .सी.सी.बँक	1,76,12,481.83	
0.00	उद्यम विकास सह बँक सी.आर.आर.गुंतवणुक	10,00,279.00	
30,00,000.00	वारणा सहकारी बँक मुदत ठेव	5,00,000.00	
65,00,000.00	राजगुरुनगर सहकारी बँक मुदत ठेव	65,00,000.00	
45,00,000.00	राजश्री शाहू सहकारी बँक ली.	45,00,000.00	
15,00,000.00	जिजामाता महिला सहकारी बँक	–	
36,04,700.00	देवगिरी नागरी सह. बँक लि.	50,28,976.00	
15,01,233.00	दि कराड अर्बन को ऑप बँक लि.	–	
0.00	महेश सह बँक मुदत ठेवी	10,00,192.00	
23,850.00	**भाग व शेअर्स**		**23,850.00**
10,750.00	पी.डी.सी.सी.बँक शेअर्स	10,750.00	
4,000.00	मध्यवर्ती कन्झुमर्स स्टोअर शेअर्स	4,000.00	
2,000.00	पुणे जिल्हा नागरी पतसंस्था शेअर्स	2,000.00	
100.00	पुणे सह. बँक शेअर्स	100.00	
3,000.00	महा.राज्य.जिल्हा सह पतसंस्था फेडरेशन शेअर्स	3,000.00	
4,000.00	नॅशनल युवा को ऑप सोसायटी.	4,000.00	
9,40,30,549.40	**बेरीज पुढील पानावर**		**9,60,57,896.64**

दि. 31 मार्च 2026 अखेरचे ताळेबंदपत्रक

31/03/2025 Rs. Ps.	भाग भांडवल व देणी	31/03/2026	Rs. Ps.
46,27,84,912.40	**बेरीज मागील पानावरून**		**48,53,74,767.29**
3,07,11,591.80	**इतर देणी**		**23,06,251.10**
2,72,40,110.60	अनामत देणे नं.१	10,82,938.90	
800.00	प्रोफेशनल टॅक्स	1,200.00	
15,22,146.00	लाभांश देणे सन २०२०२१	-	
6,52,173.00	लाभांश देणे सन २०२१२२	-	
12,16,562.20	लाभांश देणे २२२३	12,16,512.20	
79,800.00	भाग रक्कम परत देणे	5,600.00	
2,60,931.00	**तरतूद**		**4,50,000.00**
2,60,931.00	ऑडिट फि तरतुद	4,50,000.00	
3,65,29,270.76	**बँकेतील ओ.डी/क्रेडिट**		**3,97,24,238.73**
9,33,687.42	पुणे पिपल्स बँक सी सी एच ओ	-	
25,71,767.74	जनता सह बँक सी. सी. शनिपार	18,15,382.26	
18,53,466.44	बारामती सहकारी बँक ओडी, शनीपार	41,45,170.42	
1,91,088.74	पुणे पीपल्स रामदुत शाखा सी.सी.६०१/२९ शनीपार	13,67,084.35	
7,01,055.42	पुणे पीपल्स बँक सी सी कर्वेनगर	1,76,962.28	
24,78,318.30	सोलापूर जनता सहकारी बँक कर्वेनगर	24,53,647.30	
64,97,320.90	पुणे मर्चंट बँक सी सी HO	65,20,239.90	
67,00,943.00	विश्वेश्वर सह बँक सी सी HO	66,45,803.00	
56,99,294.54	कॉसमॉस सह बँक सी सी HO	41,29,971.48	
40,08,678.26	राजश्री शाहू सह बँक सी सी HO	39,82,906.26	
48,93,650.00	राजगुरूनगर सह बँक सी सी HO	41,64,091.38	
0.00	देवगिरी बँक सी सी HO	43,22,980.10	
1,24,93,500.00	**देणे व्याज**		**10,02,949.00**
14,204.00	दैनंदिन ठेव व्याज देणे	24,528.00	
10,59,340.00	मुदत ठेव व्याज देणे	8,30,900.00	
91,090.00	संचित ठेव व्याज देणे	-	
23,498.00	अल्पमुदत ठेव व्याज देणे	10,847.00	
8,147.00	वर्षा ठेव योजना व्याज देणे	8,147.00	
3,28,907.00	आवर्तक ठेव व्याज देणे	211.00	
7,412.00	लखपती योजना व्याज देणे	-	
1,53,389.00	लखपती ठेव योजना व्याज देणे	-	
23,732.00	सुवर्ण महोत्सवी योजना व्याज देणे	-	
12,055.00	अर्धशतक योजना व्याज देणे	-	
37,052.00	अर्धशतक प्राप्ती व्याज देणे	-	
2,20,263.00	सारस धनवर्षा योजना व्याज देणे	-	
72,64,721.00	सारस निरंतर योजना व्याज देणे	-	
32,39,928.00	सारस मान्सून ठेव योजना व्याज देणे	1,875.00	
9,312.00	सारस आवर्तक ठेव व्याज देणे	-	
450.00	अल्पवधी मुदत ठेव व्याज देणे	1,09,005.00	
0.00	सारस मुदत ठेव व्याज देणे	13,999.00	
0.00	सारस शतम ठेव योजना व्याज देणे	3,437.00	
33,605.00	**इतर देणी व तरतूदी**		**48,438.00**
33,605.00	सेवकांचा प्रॉव्हिडंड फंड	38,985.00	
0.00	सेवकांचा ई एस आय सी फंड	5,566.00	
0.00	इतर खर्च देणे	3,887.00	
54,28,13,810.96	**बेरीज पुढील पानावर**		**52,89,06,644.12**

दि. 31 मार्च 2026 अखेरचे ताळेबंदपत्रक

31/03/2025 Rs. Ps.	मालमत्ता व येणी	31/03/2026	Rs. Ps.
9,40,30,549.40	**बेरीज मागील पानावरून**		**9,60,57,896.64**
329917443.39	**कर्ज**		**31,60,07,201.33**
2864052.25	हायपोथिकेशन कर्ज	30,73,994.25	
918303.46	हमी कर्ज	-	
364794.50	हायपरचेस कर्ज	3,64,822.50	
20740334.60	घरगुती अडचणीसाठी कर्ज	2,18,69,177.90	
4075532.00	ठेवी तारण कर्ज मुदत ठेव	55,95,739.00	
35628697.30	व्यवसाय वाढीसाठी कर्ज	2,64,72,667.80	
6671378.62	लवादी कर्ज	66,71,378.62	
10148681.60	ठेवी तारण कर्ज कॅश क्रेडीट	44,76,794.00	
634465.52	कुटूंब इच्छापुर्ती योजना	3,19,501.72	
208884789.28	गृह तारण कर्ज योजना	20,68,86,194.28	
13997715.26	रिक्षा तारण कर्ज	1,38,86,413.26	
1200429.00	सोने तारण कर्ज	60,78,117.00	
92650.00	रिकरींग ठेव तारण कर्ज	-	
0.00	पिग्मी तारण कर्ज	8,828.00	
22527152.00	सूक्ष्म वित्त कर्ज	1,41,80,928.00	
1168468.00	कॅश क्रेडिट / ओ डी कर्ज	15,04,260.00	
0.00	स्थावर तारण कर्ज	46,18,385.00	
271948.00	**येणे व्याज**		**94,398.00**
52312.00	विश्वेशर सहकारी बँक मुदत ठेव	-	
22837.00	ठाणे जनता सहकारी बँक मुदत ठेव	-	
0.00	अंबरनाथ जय हिंद को ऑफ बँक लि	26,157.00	
50371.00	पुणे मर्चंट्स को ऑप बँक सी.आर.आर.गुंतवणूक व्याज येणे	-	
32137.00	उद्यम विकास सह बँक सी.आर.आर.गुंतवणुक व्याज येणे	-	
53815.00	वारणा सहकारी बँक मुदत ठेव व्याज येणे	7,933.00	
1038.00	दि वाई अर्बन को ऑफ बँक मुदत ठेव व्याज येणे	-	
29063.00	जिजामाता महिला सहकारी बँक व्याज येणे	-	
30375.00	देवगिरी नागरी सह. बँक लि. व्याज येणे	60,308.00	
0.00	**इतर येणी व तरतूदी**		**2,694.46**
0.00	लायब्ररी खाते	950.00	
0.00	इन्शुरन्स कमिशन येणे	1,744.46	
67137555.15	**स्टॉक व इतर**		**6,51,51,918.40**
0.00	पिओसिट सॉफ्टवेअर्स	2,47,328.00	
3416480.87	डेड स्टॉक	34,59,539.01	
5929602.28	इमारतीतील जागा	56,33,121.39	
57742910.00	नॉन बॅंकिंग ॲसेट	5,56,65,915.00	
48562.00	स्टेशनरी स्टॉक	1,46,015.00	
55867732.22	**शाखा**		**10,06,06,703.50**
0.00	हेडऑफिस	2,22,47,889.63	
49788270.17	शनिपार शाखा	5,22,55,861.87	
6079462.05	कर्वेनगर शाखा	-	
0.00	हेड ऑफिस ग्रो सेटलमेंट	2,32,55,404.00	
0.00	शनीपार ग्रो सेटलमेंट	24,89,242.00	
0.00	कर्वेनगरसी सी ग्रो सेटलमेंट	3,58,306.00	
54,72,25,228.16	**बेरीज पुढील पानावर**		**57,79,20,812.33**

दि. 31 मार्च 2026 अखेरचे ताळेबंदपत्रक

31/03/2025 Rs. Ps.	भाग भांडवल व देणी	31/03/2026	Rs. Ps.
54,28,13,810.96	**बेरीज मागील पानावरून**		**52,89,06,644.12**
5,61,00,098.22	**शाखा**		**10,06,04,092.50**
50,82,765.73	हेडऑफिस	–	
3,47,26,487.38	कोथरूड शाखा	4,36,18,338.13	
0.00	कर्वेनगर शाखा	3,04,58,339.96	
1,62,90,845.11	कर्वेनगर शाखा सी.सी.	4,27,073.41	
0.00	कर्वे नगर ग्रो सेटलमेंट	2,52,20,161.00	
0.00	कोथरूड ग्रो सेटलमेंट	8,80,180.00	
1,37,222.00	**क्रेडिटर**		**1,48,029.00**
1,37,222.00	क्रेडिटर	1,48,029.00	
6,01,10,525.00	**थकीत व्याज रिजर्व**		**7,19,39,911.00**
6,01,10,525.00	थकीत व्याज रिजर्व	7,19,39,911.00	
65,91,61,656.18	एकूण		70,15,98,676.62

तोरवी पेठे अँन्ड कंपनी करिता.

चार्टड अकौटंटस

एफ आर नंबर: 120456 डब्लू

सी ए योगेश राजगोपाल लकडे

भागीदार

सदस्य नंबर: 132824

सहकारी सदस्य नंबर: 16738

UDIN : 25132824 BMGXNT 4279

तारीख: जुलै 31 , 2026; पुणे.

दि. 31 मार्च 2026 अखेरचे ताळेबंदपत्रक

31/03/2025 Rs. Ps.	मालमत्ता व येणी	31/03/2026	
			Rs. Ps.
54,72,25,228.16	**बेरीज मागील पानावरून**		**57,79,20,812.33**
24,94,231.10	**इतर येणी**		**27,64,573.66**
1,75,000.00	जागा डिपॉझिट कर्वेनगर शाखा	1,00,000.00	
7,990.00	इलेक्ट्रिसिटी डिपॉझिट	7,990.00	
7,50,838.00	अनामत येणे	7,75,838.00	
50,000.00	जागा डिपॉझिट कोथरूड	2,28,000.00	
13,12,051.10	टी.डी.एस. येणे	12,52,065.10	
22,000.00	फेस्टिवल ॲडव्हान्स	48,000.00	
1,76,352.00	न्याय प्रविष्ट येणी	3,52,680.56	
4,93,31,671.92	**तोटा**		**4,73,80,199.63**
2,43,05,459.06	तोटा	–	
2,50,26,212.86	संचित तोटा	4,93,31,671.92	
–	(-) चालू वर्षाचा नफा	19,51,472.29	
6,01,10,525.00	**थकीत व्याज येणे**		**7,19,39,911.00**
4,51,33,964.00	गृह तारण कर्ज योजना ओ.आय.आर.व्याज येणे	5,68,55,358.00	
19,39,085.00	गृह तारण कर्ज योजना दंड .व्याजओ.आय.आर	44,91,462.00	
11,21,920.00	घरगुती अडचणीसाठी कर्ज ओ. आय.आर व्याज येणे	30,29,197.00	
50,037.00	घरगुती अडचणीसाठी कर्ज ओ. पी आय.आर व्याज येणे	2,41,901.00	
2,83,528.00	हायपोथिकेशन कर्ज ओ आय आर व्याज येणे	3,85,357.00	
13,454.00	हायपोथिकेशन कर्ज ओ पी आय आर व्याज येणे	24,803.00	
75,55,259.00	व्यवसाय वाढीसाठी कर्ज ओ आय आर व्याज येणे	7,18,578.00	
0.00	व्यवसाय वाढीसाठी कर्ज ओ पी आय आर व्याज येणे	12,275.00	
43,560.00	कुटूंब इच्छापुर्ती योजना ओ आय आर व्याज येणे	43,539.00	
5,227.00	कुटूंब इच्छापुर्ती योजना ओ पी आय आर व्याज येणे	5,496.00	
38,96,662.00	रिक्षा तारण कर्ज ओ आय आर व्याज येणे	60,94,280.00	
61,492.00	हायपरचेस कर्ज थकबाकी व्याज व्याज येणे	33,741.00	
6,337.00	हायपरचेस कर्ज थकबाकी दंडव्याज व्याज येणे	3,924.00	
0.00	**वसुली खर्च येणे**		**15,93,180.00**
0.00	घरगुती अडचणीसाठी कर्ज वसुली खर्च येणे	36,927.00	
0.00	व्यवसाय वाढ वसुली खर्च येणे	11,301.00	
0.00	गृहतारण तारण कर्ज वसुली खर्च येणे	15,44,952.00	
65,91,61,656.18	एकूण		70,15,98,676.62

श्री. जरांडे नितीन म्हस्कू
उपाध्यक्ष

श्री. कुलकर्णी भालचंद्र वसंत
अध्यक्ष

श्री. धारप गणेश गंगाधर
संचालक

श्री. कावळे अनिल मुरलीधर
संचालक

श्री. चंपानेरकर जितेंद्र दत्तात्रय
संचालक

श्री. रसाळ सुनील विठ्ठल
संचालक

श्री. दीक्षित शरद दत्तात्रय
संचालक

सौ. मोकासदार उल्का चारुदत्त
संचालिका

श्री. नातू विजय सदाशिव
तज्ञ संचालक

श्री. भवाळकर गिरीश शांताराम
तज्ञ संचालक

श्री.फडके सुहास भास्कर
मुख्य कार्यकारी अधिकारी

नफा तोटा पत्रक (01/04/2025 ते 31/03/2026)

31/03/2025 Rs. Ps.	खर्च	31/03/2026	31/03/2026 Rs. Ps.
74,796.00	**गुंतवणूकीवरील व्याज**		**33,175.00**
74,796.00	व्याज वसूल ठेवी व गुंतवणुकीवरील	33,175.00	
3,48,54,828.95	**ठेवीवरील व्याज**		**3,45,90,818.35**
30,917.00	दैनंदिन ठेव व्याज	42,820.00	
12,86,734.95	बचत ठेव व्याज	9,24,508.35	
37,72,883.00	मुदत ठेव व्याज	10,86,606.00	
1,55,966.00	संचित ठेव व्याज	28,641.00	
78,412.00	अल्पमुदत ठेव व्याज	37,941.00	
3,380.00	सहामही ठेव व्याज	5,392.00	
7,56,014.00	तिमाही ठेव व्याज	1,00,136.00	
85,77,694.00	मासिक ठेव व्याज	34,74,767.00	
0.00	मासिक उत्पन्न ठेव व्याज	9,748.00	
8,147.00	वर्षा ठेव योजना व्याज	0.00	
6,43,047.00	आवर्तक ठेव व्याज	2,95,094.00	
40,355.00	व्याज दिले ठेवीवरील	73,801.00	
17,089.00	लखपती योजना व्याज	0.00	
48,436.00	लखपती ठेव योजना व्याज	52,626.00	
20,14,819.00	लखपती पेन्शन योजना व्याज	15,20,943.00	
1,04,194.00	सुवर्ण महोत्सवी योजना व्याज	0.00	
1,26,573.00	अर्धशतक योजना व्याज	5,918.00	
54,894.00	अर्धशतक प्राप्ती व्याज	9,698.00	
1,64,986.00	धनसंचय योजना व्याज	0.00	
11,76,749.00	सारस धनवर्षा योजना व्याज	2,39,723.00	
35,99,669.00	सारस समृद्धी योजना व्याज	20,15,286.00	
74,48,910.00	सारस निरंतर योजना व्याज	31,66,461.00	
1,431.00	वक्रतुंड ठेव योजना व्याज	0.00	
32,83,626.00	सारस मान्सून ठेव योजना व्याज	80,75,277.00	
14,50,141.00	सारस मान्सून मासिक ठेव योजना व्याज	1,00,43,727.00	
9,312.00	सारस आवर्तक ठेव व्याज	3,98,272.00	
450.00	अल्पवधी मुदत ठेव व्याज	1,90,748.00	
0.00	सारस मुदत ठेव व्याज	16,69,304.00	
0.00	सारस संचयी योजना व्याज	10,64,931.00	
0.00	सारस आवर्तक ठेव योजना व्याज	55,013.00	
0.00	सारस शतम ठेव योजना व्याज	3,437.00	
27,31,875.28	**सर्वसाधारण खर्च**		**2,00,102.00**
0.00	हायपोथिकेशन कर्ज रीबेट	57,406.00	
1,02,728.50	घरगुती अडचणीसाठी कर्ज रीबेट	84,588.00	
12,38,465.00	गृह तारण कर्ज योजना रीबेट	0.00	
13,84,681.78	रिक्षा तारण कर्ज रीबेट	50,879.00	
6,000.00	सूक्ष्म वित्त कर्ज रिबेट	7,229.00	
3,76,61,500.23	**बेरीज पुढील पानावर**		**9,48,24,095.35**

नफा तोटा पत्रक (01/04/2025 ते 31/03/2026)

31/03/2025 Rs. Ps.	उत्पन्न	31/03/2026	Rs. Ps.
1,44,93,345.10	**कर्जावरील व्याज**		**3,98,17,145.30**
1,34,152.00	हायपोथिकेशन कर्ज व्याज	4,71,915.00	
0.00	हायपरचेस कर्ज व्याज	86,119.00	
19,57,337.10	घरगुती अडचणीसाठी कर्ज व्याज	14,92,102.80	
3,04,257.00	ठेवी तारण कर्ज मुदत ठेव व्याज	5,16,303.00	
0.00	शैक्षणिक कर्ज व्याज	1,57,218.00	
6,75,623.00	व्यवसाय वाढीसाठी कर्ज व्याज	1,20,67,216.50	
9,35,677.00	ठेवी तारण कर्ज कॅश क्रेडीट व्याज	5,22,025.00	
75,236.00	कुटूंब इच्छापुर्ती योजना व्याज	71,618.00	
47,54,046.00	गृह तारण कर्ज योजना व्याज	2,06,46,350.00	
89,112.00	रिक्षा तारण कर्ज व्याज	66,500.00	
1,04,031.00	सोने तारण कर्ज व्याज	4,12,098.00	
1,76,400.00	व्याज वसूल कर्जावरील	0.00	
36,954.00	रिकरींग ठेव तारण कर्ज व्याज	20,114.00	
0.00	पिग्मी तारण कर्ज व्याज	237.00	
51,70,660.00	सूक्ष्म वित्त कर्ज व्याज	26,80,522.00	
79,860.00	कॅश क्रेडिट / ओ डी कर्ज व्याज	1,68,322.00	
0.00	स्थावर तारण कर्ज व्याज	4,38,485.00	
83,449.00	**कर्जावरील दंड व्याज**		**17,70,812.00**
72.00	हायपोथिकेशन कर्ज दंड व्याज	34,175.00	
0.00	हायपरचेस कर्ज दंड व्याज	9,709.00	
19,094.00	घरगुती अडचणीसाठी कर्ज दंड व्याज	89,374.00	
0.00	व्यवसाय वाढीसाठी कर्ज दंड व्याज	1,26,319.00	
1,172.00	कुटूंब इच्छापुर्ती योजना दंड व्याज	7,315.00	
40,225.00	गृह तारण कर्ज योजना दंड व्याज	14,74,983.00	
22,886.00	सूक्ष्म वित्त कर्ज दंडव्याज	28,937.00	
68,87,786.88	**गुंतवणूकीवरील व्याज**		**67,52,672.12**
11,10,682.00	पुणे पिपल्स बँक मुदत ठेव	9,98,839.00	
2,29,635.00	सोलापूर जनता सह. बँक मुदत ठेव	2,29,769.00	
3,83,797.00	विश्वेशर सहकारी बँक मुदत ठेव	6,51,170.00	
1,01,709.00	ठाणे जनता सहकारी बँक मुदत ठेव	98,831.00	
27,453.00	अपणा सहकारी बँक मुदत ठेव	0.00	
21,734.00	डोंबिवली नागरी सहकारी बँक मुदत ठेव	110.00	
0.00	जनसेवा सहकारी बँक मुदत ठेव	130.00	
6,07,666.00	कॉसमॉस सहकारी बँक मुदत ठेव व्याज	5,24,808.00	
20,814.00	दि ठाणे जनता सह बँक मुदत ठेव	0.00	
1,232.88	अंबरनाथ जय हिंद को ऑफ बँक लि	1,15,629.12	
44,133.00	जनसेवा सहकारी बँक ठेवी	34,000.00	
4,04,618.00	बारामती सह बँक ठेवी	5,49,916.00	
2,14,64,580.98	**बेरीज पुढील पानावर**		**4,83,40,629.42**

नफा तोटा पत्रक (01/04/2025 ते 31/03/2026)

31/03/2025 Rs. Ps.	खर्च	31/03/2026	31/03/2026 Rs. Ps.
3,76,61,500.23	**बेरीज मागील पानावरून**		**9,48,24,095.35**
95,65,907.26	**इतर खर्च**		**1,23,57,446.25**
20,60,043.00	व्याज दिले बँक कर्जावरील	38,17,600.00	
36,60,189.00	पगार खर्च	38,73,793.00	
1,55,049.00	सानुग्रह अनुदान	2,18,866.00	
51,421.00	सेवाशुल्क	1,86,484.00	
1,22,563.00	प्रिंटिंग व स्टेशनरी	11,637.00	
1,03,592.00	प्रवास खर्च	99,905.00	
55,518.00	टेलिफोन खर्च	57,912.00	
2,05,653.00	ऑफिस खर्च	2,70,011.00	
17,796.00	किरकोळ खर्च	33,244.00	
1,09,120.00	सादिलवार खर्च	1,21,571.00	
174.00	टपाल व पोस्टेज खर्च	1,567.00	
75,864.00	मासिक सभा खर्च	65,604.00	
21,274.00	वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च	50,020.00	
14,836.00	जाहिरात खर्च	15,800.00	
51,217.26	बँक चार्जेस	33,706.50	
3,300.00	वर्गणी	700.00	
30,738.00	विमा खर्च	41,861.00	
1,08,700.00	इलेक्ट्रिसिटी चार्जेस	1,17,790.00	
1,59,256.00	देखभाल व दुरूस्ती	2,00,614.00	
1,13,842.00	मिळकत कर	65,467.00	
2,12,400.00	ऑडीट फी	5,70,115.00	
1,46,787.00	लीगल चार्जेस	1,22,462.00	
33,450.00	व्यवस्थापकीय खर्च	36,838.00	
2,500.00	व्यवसाय कर	2,500.00	
5,956.00	सेवक प्रशिक्षण खर्च	9,440.00	
6,00,000.00	भाडे खर्च	6,73,500.00	
42,000.00	सोसायटी मेन्टेनन्स	42,000.00	
26,257.00	इन्टरनेट खर्च	32,317.00	
4,79,678.00	घसारा डेड स्टॉक	4,62,371.86	
3,12,083.00	इमारत जागा घसारा	2,96,480.89	
2,20,244.00	प्रा. फंड सोसायटी हिस्सा खाते	2,41,059.00	
3,178.00	स्टेशनरी खर्च	1,261.00	
41,101.00	कार्यक्रम खर्च	1,53,312.00	
45,000.00	वकील फी	0.00	
40,000.00	कन्सल्टिंग चार्जेस	1,10,000.00	
2,18,548.00	सॉफ्टवेअर मेंटेनन्स	2,19,448.00	
16,580.00	झेरॉक्स खर्च	22,760.00	
0.00	ई एस आय सी फंड सोसायटी हिस्सा खाते	15,597.00	
0.00	सॉफ्टवेअर घसारा खर्च	61,832.00	
0.00	चालू नफा		**19,51,472.29**
0.00	चालू नफा	19,51,472.29	
4,72,27,407.49	**एकूण**		**4,91,33,013.89**

नफा तोटा पत्रक (01/04/2025 ते 31/03/2026)

31/03/2025 Rs. Ps.	उत्पन्न	31/03/2026	Rs. Ps.
2,14,64,580.98	**बेरीज मागील पानावरून**		**4,83,40,629.42**
2,78,952.00	जनता बँक ठेवी	2,23,502.00	
6,37,331.00	पुणे मर्चंट्स को ऑप बँक सी.आर.आर. गुंतवणूक व्याज	6,03,911.00	
21,658.00	वारणा सहकारी बँक / 2 कर्वे सीसी. व्याज	0.00	
13,11,612.00	पी.डी .सी.सी.बँक व्याज	12,49,280.00	
0.00	उद्यम विकास सह बँक सी.आर.आर.गुंतवणुक व्याज	279.00	
2,71,953.00	वारणा सहकारी बँक मुदत ठेव व्याज	1,27,733.00	
29,630.00	दि वाई अर्बन को ऑफ बँक मुदत ठेव व्याज	0.00	
5,20,724.00	राजगुरुनगर सहकारी बँक मुदत ठेव व्याज	5,06,470.00	
5,04,923.00	राजश्री शाहू सहकारी बँक ली. व्याज	3,59,616.00	
1,35,325.00	जिजामाता महिला सहकारी बँक व्याज	55,897.00	
2,20,972.00	देवगिरी नागरी सह. बँक लि. व्याज	3,91,871.00	
1,233.00	दि कराड अर्बन को ऑप बँक लि. व्याज	30,719.00	
0.00	महेश सह बँक मुदत ठेवीव्याज	192.00	
14,56,609.45	**इतर उत्पन्न**		**7,86,692.47**
1,708.00	मुदतपूर्व एजंट कमिशन	7,386.00	
860.00	पी.डी.सी.सी बँक लाभांश	860.00	
24,007.60	किरकोळ उत्पन्न	88,898.04	
14,11,240.00	प्रोसेसिंग चार्जेस	6,60,150.00	
104.00	चेक रिटर्न चार्जेस	750.00	
7,689.85	आर टी जी एस चार्जेस	5,603.97	
11,000.00	लॉकर भाडे	21,300.00	
0.00	इन्शुरन्स कमिशन	1,744.46	
394.00	**इतर खर्च**		**1,374.00**
394.00	वसूली खर्च	1,374.00	
364.00	**बँक व्याज**		**4,318.00**
364.00	पुणे सहकारी बँक बचत खाते क्र.2837 शनीपार व्याज	0.00	
0.00	पी.डी.सी.सी.बचत खाते नं.2.94 व्याज	4,318.00	
2,43,05,459.06	**चालू तोटा**		**0.00**
2,43,05,459.06	चालू तोटा	0.00	
4,72,27,407.49	एकूण		4,91,33,013.89

श्री.फडके सुहास भास्कर	श्री. जरांडे नितीन म्हस्कू	श्री. कुलकर्णी भालचंद्र वसंत
मुख्य कार्यकारी अधिकारी	उपाध्यक्ष	अध्यक्ष

भावपूर्ण श्रद्धांजली !

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री कै. अजितदादा पवार
सहकार भारतीचे संस्थापक सदस्य कै. वसंतराव देवधर
ज्येष्ठ बँकिंग व सहकार तज्ज्ञ कै. खळदकर अरविंद केशव
ज्येष्ठ बँक अधिकारी कै. देवधर नंदकिशोर अनंत
तसेच विविध क्षेत्रातील,
कै. क्षीरसागर सतीश अंबादास
कै. पारखी सुरेश विष्णू

कै. फडके उज्वला सुहास
कै. भावे विनायक पुरुषोत्तम
कै. कुलकर्णी शैलजा भालचंद्र
कै. गवते शांताबाई विठ्ठल
कै. कुलकर्णी उषा दिलीप
त्याचबरोबर नेपाळमध्ये झालेल्या भीषण पूरदुर्घटनेत
जीवितहानी झालेले सर्व नागरिक

तसेच संस्थेचे दिवगंत सभासद व त्यांचे नातेवाईक यांना
सारस पतसंस्थेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली...

सभासदांना नम्र सूचना :

1) सर्व सभासदांना कळविण्यात येते की, आपण आपला मोबाईल नंबर, टेलिफोन नंबर व आपला ई–मेल तसेच संपूर्ण पत्ता त्यात काही बदल असल्यास त्वरीत संस्थेत कळवावा. म्हणजे संस्थेतर्फे घेण्यात येणारे निरनिराळे सेवा प्रकल्प कळविण्यात येऊ शकतील व आपण त्या सेवाप्रकल्पात सहभागी होऊ शकाल.
2) प्रत्येक सभासदाने आपल्या खात्यातील विविध नोंदी कार्यालयात येऊन तपासाव्यात व त्या मान्य असल्याबद्दल कळवावे.
3) सभासदांनी अद्याप बचत खाते सुरू केले नसल्यास ते त्वरित उघडावे, शेअर्स सर्टिफिकेट घेऊन जावीत.
4) मागील लाभांश नेला नसल्यास तो त्वरीत घेऊन जावा, नाहीतर तो गंगाजळीमध्ये जमा केला जाईल.
5) कर्ज हप्ता नियमित भरून जामीनदार अडचणीत येणार नाहीत, याची कर्जदारांनी काळजी घ्यावी.
6) दिवंगत सभासदांची माहिती त्यांचे नातेवाईक मित्रमंडळींनी संस्थेस कळवावी म्हणजे संस्था त्याची नोंद घेईल.
7) संस्थेने सुरू करावेत असे नवीन प्रकल्प, त्याबाबतची माहिती, आपल्या सूचना व मते आपण संस्थेस कळवावीत.
8) सभासदांनी आपल्या खात्यासाठी नव्याने केवायसी कागदपत्र सादर करावीत.

राजगुरूनगर सभासद आनंद मेळावा

कर्वेनगर शाखेत सभासदांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन

कर्वेनगर शाखा लॉकर सुविधा शुभारंभ

राजगुरुनगर शाखा लॉकर सुविधा शुभारंभ

नवनिर्वाचित नगरसेवकांच्या संस्थेतर्फे सत्कार – श्री. कुणाल टिळक, सौ. स्वप्नाली पंडित व श्री. बापू मानकर

पतसंस्था फेडरेशनचे ज्येष्ठ संचालक श्री. काका कोयटे

अ. भा. ब्राह्मण महासंघाचे संस्थापक डॉ. गोविंद कुलकर्णी

संस्थेस विविध मान्यवरांच्या भेटी

अल्पावधी मुदत ठेव

३० ते ४४ दिवस (४%)
४५ ते १८० दिवस (५%)
१८१ ते ३६४ दिवस (५.५०%)

सारस मुदत ठेव

१२ महिने ते २४ महिने
द.सा.द.शे.-९.५०%

२५ महिने ते ३६ महिने
द.सा.द.शे.-१०%

(मासिक/त्रैमासिक व्याजाची सुविधा उपलब्ध)

सारस संचयी ठेव योजना

१२ महिने ते २४ महिने (द.सा.द.शे. ९.५० % मुदतीअंती)
२५ महिने ते ३६ महिने (द.सा.द.शे. १० % मुदतीअंती)

सारस दामदुप्पट ठेव योजना

८५ महिने रु. १०००/- गुंतवल्यास २०००/-
(व्याजदर द.सा.द.शे. १०%)

सारस आवर्तक ठेव योजना

(आवर्तक ठेव योजना ही किमान रु. १००/- व पुढे)

कालावधी	दरमहा गुंतवणूक	व्याजदर (द.सा.द.शे.)	मुदतीअंती मिळणारी रक्कम
१२ महिने	रु. १०००/-	९.५०%	रु. १२६३१/-
२४ महिने	रु. १०००/-	९.५०%	रु. २६५०६/-
३६ महिने	रु. १०००/-	१०%	रु. ४२०७६/-

रजि.नं. PNA/BNK/200/स्थापना १५ ऑगस्ट १९७२

सारस अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

मुख्य कार्यालय : सीटीएस क्र. ६७८/६७९,
चिंतामणी हाईटस्, स्वस्तिक सोसायटी,
कमिन्स कॉलेज रोड, कर्वेनगर पुणे - ५२
फोन : ०२०-२९९९३४६०, **मो.** ८३८०००३४६०
ईमेल : sarasurban@gmail.com
वेबसाईट : www.sarasurban.com